# प्रेस नोट

दिनांक १६/०४/२०२१

**भुमिअभिलेख कार्यालय, कल्याण येथील भुकरमापक यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी ताब्यात घेतलेबाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | — |
| कलम | — |
| लोकसेवकाचे नाव कार्यालय | १) भुषण जयसिंग गिरासे, भुकरमापक, भुमिअभिलेख कार्यालय, कल्याण (वर्ग ३)<br>२) चंद्रशेखर जगन्नाथ अहिरराव, भुकरमापक, भुमिअभिलेख कार्यालय, कल्याण (वर्ग ३) |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | रूपये २,००,०००/—<br>तडजोडीअंती रूपये १,८०,०००/— |
| स्विकारलेल्या लाचेची रक्कम | रूपये १,८०,०००/— |
| थोडक्यात हकिकत | तक्रारदार यांच्या गोवेली व रायता, ता. कल्याण, येथील जमीनीची मोजणी करून 'क' प्रत देण्याकरीता भुमिअभिलेख कार्यालय, कल्याण येथील लोकसेवकांनी रूपये २,००,०००/— लाचेच्या रक्कमेची मागणी केली होती. त्यावरून तक्रारदार यांनी ला.प्र.वि., ठाणे कार्यालयात समक्ष हजर राहून दि. २५/०३/२०२१ रोजी तक्रार दिली होती.<br>प्राप्त तक्रारीवरून दि.३०/०३/२०२१ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान तक्रारदार यांच्या गोवेली येथील जमिनीची मोजणी करून 'क' प्रत दिल्याबद्दल व रायता येथील जमिनीची मोजणी करून 'क' प्रत देण्याकरीता लोकसेवक क्र. १ व २ यांनी रूपये २,००,०००/— लाचेची मागणी केली. पुन्हा आज दि. १६/०४/२०२१ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान लोकसेवक १ व २ यांनी तडजोडीअंती रूपये १,८०,०००/— स्विकारण्याचे मान्य केले.<br>त्यावरून आज दि. १६/०४/२०२१ रोजी आजमविण्यात आलेल्या लाचेच्या सापळा कारवाईदरम्यान नमुद लोकसेवक क्र. १ यांनी रूपये १,५०,०००/— व लोकसेवक क्र २ यांनी रूपये ३०,०००/— लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर नमुद दोन्ही लोकसेवक यांना सापळा पथकाने रंगेहात पकडले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांच्याशी संपर्क करावा.

---


**संपर्क पत्ता** :— **ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१**

**संकेतस्थळ** :— acbmaharashtra@mahapolice.gov.in

**ई—मेल** :— spacbthane@mahapolice.gov.in

**ऑनलाईन तक्रार** :—

**ॲप्लीकेशन** :— acbmaharashtra.net

**टोल फ्री नं.** :— १०६४

**दुरध्वनी क्र.** :— ०२२—२०८१३५९८/ २०८१३५९९

**व्हॉटस् ॲप क्र.** :— ९९३०९९७७००


( निलीमा कुलकर्णी )
पोलीस उप अधीक्षक
ला.प्र.वि., ठाणे.